# वाघ अभियांत्रिकीतर्फे सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा

नाशिक, ता. ३० : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, तर्कबुद्धी आणि नवीन तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून विज्ञान व गणित विभागाकडून नुकतीच 'सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा' आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ प्राचार्य डॉ. के. एन.नांदुरकर यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी हिताच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत संगणक, माहिती तंत्रज्ञान, यांत्रिकी, विद्युत व विद्युतीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानव यांच्या प्रगतीच्या कल्पनांवर आधारित सूक्ष्म प्रकल्प सादर केले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व सल्लागार समितीचे सदस्यांनी स्पर्धेच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून त्यांच्या कौशल्याचे कौतुक केले. याप्रसंगी अध्यक्ष समीर वाघ यांनी उदयोन्मुख पिढीची तर्कबुद्धी आणि तंत्रज्ञान यांच्या जोरावर हे विद्यार्थी भविष्यातील प्रत्येक समस्येवर प्रभावी उपाय शोधतील अशी आशा व्यक्त केली. परीक्षक म्हणून प्रा. एन. एम. शहाणे, प्रा. मरियम मणियार व प्रा. सचिन शिंदे यांनी कामकाज पाहिले. उपक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. एस. एस. साने, विभागप्रमुख डॉ. प्रिती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन प्रा. स्वाती पवार यांनी केले. यशस्वितेसाठी विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ आणि सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी अभिनंदन केले.

लोकमत

# राजकारणात गुरु-शिष्यांच्या जोड्या दुर्मीळ होताहेत

## आहेर : काकासाहेब वाघ यांचे पुण्यस्मरण



**नाशिक** : राजकारणात गुरू-शिष्याच्या जोड्या दुर्मीळ होत आहेत. मात्र, पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ आणि सहकार महर्षी कै. माधवराव बोरस्ते या गुरू-शिष्याच्या जोडीने आपले गुरू-शिष्याचे नाते आयुष्यभर जपले. अशा भावना आमदार डॉ. राहुल आहेर यांनी व्यक्त केल्या.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकार महर्षी कै. माधवराव बोरस्ते व कै. काकूशेठ उदेशी या त्रयींचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम नुकताच पार पडले. याप्रसंगी आमदार आहेर बोलत होते. व्यासपीठावर आमदार सुधीर तांबे, प्राचार्य दिलीप धोंडगे, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतलाताई वाघ, सचिव प्रा के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, माणिकराव बोरस्ते, कोंडाजी आव्हाड उपस्थित होते. बहुजन समाजासाठी शेती, शिक्षण, व्यापार, सहकार या चार सूत्रीवर काकासाहेब काम करीत राहिले. असे प्रतिपादन माजी प्राचार्य दिलीप धोंडगे यांनी केले. कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा विचारांचा वारसा कै. बाळासाहेब वाघ यांनी आयुष्यभर जपल्याचे डॉ. तांबे म्हणाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ के. एन. नांदूरकर यांनी केले.

Hello Nashik
Page No. 3 Jul 26, 2022
Powered by: erelego.com



नाशिक : कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकार महर्षी माधवराव बोरस्ते, काकूशेठ उदेशी यांना आदरांजली वाहताना आमदार डॉ. राहुल आहेर. शेजारी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, आ. डॉ. सुधीर तांबे आदी.

# वाघ संस्थेत कर्मवीरांना आदरांजली

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. २४ : राजकारणात गुरुशिष्याच्या जोड्या दुर्मिळ होत आहेत. मात्र, पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ आणि सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते या गुरू-शिष्याच्या जोडीने आपले हे उत्कट नाते आयुष्यभर जपले. त्यानंतर त्यांना दानशूर काकूशेठ उदेशी यांची मोलाची साथ लाभली, अशी भावना आमदार डॉ. राहुल आहेर यांनी व्यक्त केल्या.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते व दानशूर कै. काकूशेठ उदेशी या त्रयींच्या संयुक्त पुण्यस्मरण सोहळा शुक्रवारी (ता. २२) संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथे ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही सत्रात पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी प्राचार्य दिलीप धोंडगे, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतला वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, माणिकराव बोरस्ते, कोंडाजीमामा आव्हाड उपस्थित होते. आमदार डॉ. सुधीर तांबे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ हे आयुष्यभर औपचारिक पदापासून दूर राहत बहुजन समाजासाठी ते आयुष्यभर संघर्ष करत राहीले. त्यांच्या नेतृत्वात कधीच दिखाऊपणा नव्हता. काकासाहेब यांनी छंद आणि ध्यासापोटी लोककल्याणास स्वतः वाहून घेतले. बहुजन समाजासाठी शेती, शिक्षण, व्यापार, सहकार या चार सूत्रीवर काकासाहेब हे काम करत राहीले. या प्रवासात त्यांना शिष्य म्हणून सहकार महर्षी माधवराव बोरस्ते यांची, तर दानशूर काकूशेठ उदेशी यांची समर्थ साथ लाभली, असे प्रतिपादन प्राचार्य दिलीप धोंडगे यांनी केले. कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा विचारांचा वारसा कै. बाळासाहेब वाघ यांना लाभला व तो वारसा बाळासाहेब वाघ यांनी आयुष्यभर जपला, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले. प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी आभार मानले.

दिव्य सिटी

## न्यूज ब्रीफ

### के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे आज संयुक्त पुण्यतिथी सोहळा

**नाशिक** | के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कर्मवीर कै. काकासाहेब वाघ, दानशूर कै. काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी कै. तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम शुक्रवारी (दि.२२) रोजी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजिला आहे. प्रमुख पाहुणे आमदार डॉ. राहुल आहेर तर माजी प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे हे 'प्रमुख वक्ते' असतील. पदवीधर आमदार डॉ. सुधीर तांबे अध्यक्षस्थानी असतील.

Divya Marathi 22-07-2022

# वाघ अभियांत्रिकीत सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा

**नाशिक | दि. ३० प्रतिनिधी**



के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी सूक्ष्म प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांच्या हस्ते पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत, संगणक, माहिती तंत्रज्ञान, यांत्रिकी, विद्युत व विद्युतीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानव यांच्या प्रगतीच्या कल्पनांवर आधारित सूक्ष्म प्रकल्प सादर केले. परीक्षक म्हणून प्रा. एन. एम. शहाणे, प्रा. मरियम मणियार व प्रा. सचिन शिंदे यांनी कामकाज पाहिले. उपक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. एस. एस. साने, विभागप्रमुख डॉ. प्रिती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, अधिष्ठाता डॉ. सुनील कुटे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन व आभार प्रा. स्वाती पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ आणि सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी अभिनंदन केले.

31-07-2022 , Deshdoot

# नाशिक शहर

## अवतीभवती

# वाघ शिक्षण संस्थेतर्फे आज संयुक्त पुण्यस्मरण सोहळा

**नाशिक :** येथील के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर काकूशेठ उदेशी व सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण दरवर्षी २२ जुलैला साजरा केला जातो. सालाबादप्रमाणे यंदाही हा पुण्यस्मरण सोहळा शुक्रवारी (ता. २२) ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ. राहुल आहेर तर माजी प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे उपस्थित राहणार आहे. तसेच, आमदार मा. डॉ. सुधीर तांबे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. वाघ शिक्षण संस्थेची १९७० ला स्थापना झाली. संस्थेचे जिल्ह्यात अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कृषी महाविद्यालये, ललित कला महाविद्यालय व कला, विज्ञान, वाणिज्य, संगणक विज्ञान महाविद्यालये, तसेच शाळा, कनिष्ठ महाविद्यालये अशा ३२ शाखा कार्यरत आहेत. सदर ऑनलाइन कार्यक्रमासाठीची लिंक http://tinyurl.com/mr२५stnn असून झूम मीटिंग आयडी: ६१३५९६००७५ आणि पासवर्ड: ५४३२१ आहे. ऑफलाइन कार्यक्रम संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथील मीटिंग हॉल क्रमांक २, चौथा मजला येथे पार पडणार आहे. सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आणि विश्वस्त मंडळाने केले आहे.

2022-7-

# नाशिकचे वैभव पद्मश्री
# कर्मवीर काकासाहेब वाघ

**के. के. वाघ शिक्षण संस्था अर्थात, कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था, नाशिक ज्याच्या नावाने दिमाखात सुरू आहे, असे कर्मवीर काकासाहेब वाघ माझे आजोबा होते, हे मी माझे भाग्य समजतो. नाशिक जिल्ह्याचे ते वैभव होते. काकासाहेबांनी आयुष्यभर स्वतःला समाज सेवेत वाहून घेतले. या प्रवासात त्यांना माझी आजी गीताई वाघ यांची खंबीर साथ लाभली. समाजासाठी आयुष्यभर झटणारे कोल्हापूरचे शाहू महाराज, बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड महाराज व महात्मा फुलेंच्या विचारांचे ते पाईक असल्याने त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजासाठी आयुष्यभर आपले सक्रिय योगदान दिले.**

**समीर बाळासाहेब वाघ**, अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

अखिल भारतीय मराठा विद्याप्रसारक परिषदेचे प्रमुख आधारस्तंभ, मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे आधारवड, निफाड सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व रानवड कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष, इंडियन शुगर इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन, नवी दिल्लीचे अध्यक्ष, नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज, नवी दिल्लीचे सदस्य, शिक्षण क्षेत्रातील जाणकार-कर्ते सुधारक, स्वातंत्र्ययोद्धे, धुरंधर राजकारणी, सहकार-कृषी-जलसिंचन क्षेत्रातील सक्रिय कार्यकर्ते, शेतमजूर-उपेक्षित आणि गरीब कामगारांचे आधार अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पेलल्या. काकासाहेब यांनी आयुष्यात हजारो नव्हे, लाखो माणसे जोडली. ही जनता केवळ निफाड तालुक्यातील किंवा नाशिक जिल्ह्यातील नव्हती, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील आणि दिल्लीतीलही होती. काकासाहेब वाघ यांच्यानंतर माझे वडील व के. के. वाघ शिक्षण संस्थेचे दिवंगत अध्यक्ष आदरणीय (कै.) बाळासाहेब (भाऊ) वाघ यांनी त्यांचा सहकार, कृषी व शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक वारसा पुढे सुरू ठेवला. या माध्यमातून काकासाहेबांप्रमाणेच (कै.) बाळासाहेब वाघ यांनी निफाड तालुका केंद्रस्थानी ठेवून कोणतेही राजकारण न करता विविध पातळ्यांवर शासनदरबारी प्रश्न सोडविण्याचे विशेष प्रयत्न केले.

राजर्षी शाहू महाराज व महात्मा फुलेंच्या कार्यातून प्रेरणा घेत, काकासाहेबांनी नाशिक जिल्ह्यात शिक्षण प्रसार करण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न करण्याचा निश्चय केला आणि भविष्यात तो पूर्णही केला. निफाड येथे पिंपळगाव बसवंत या मध्यवर्ती ठिकाणी विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वरिष्ठ महाविद्यालय सुरू करावयाचे ठरले; पण परवानगी, पैसा, जागा आणि वर्गखोल्या यासंदर्भात अनेक अडचणी होत्या. आर्थिक अडचण दूर करण्यासाठी काकासाहेब सहकाऱ्यांसह निफाड, चांदवड, दिंडोरी व परिसरात पायी फिरले आणि त्यांनी अडीच लाख रुपये उभारले. काकासाहेबांच्या सत्तरीकरिता जमा लोकवर्गणीतून त्यांनी दोन लाख रुपये घेऊन आवश्यक त्या मुदतठेवीची पूर्तता केली. अर्ज विद्यापीठात पोचला, तेव्हा मुदत संपली होती. तेव्हा काकासाहेबांनी सहकाऱ्यांसह पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. हरिभाऊ पाटसकर यांची भेट घेत महाविद्यालयास परवानगी मिळवून दिली. काकासाहेब यांनी दाखविलेली ही धडपड आणि केलेले प्रयत्न पाहून सर्वानुमते या महाविद्यालयाचे 'कर्मवीर काकासाहेब वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय'' असे नामकरण केले. हे महाविद्यालय आजही दिमाखात सुरू आहे.

जिल्ह्याला प्रगतिपथावर न्यायचे असेल, तर सहकारातून कारखानदारीशिवाय पर्याय नाही हे जाणून त्यांनी प्रयत्न केले. त्यामागे आपला जिल्हा साखर कारखानदारीत मागे राहू नये, अशी त्यांची प्रांजळ इच्छा होती. १९५७ ते १९६२ यादरम्यान



ते विधिमंडळ सदस्य अर्थात 'आमदार'' होते. या काळात त्यांनी जिल्ह्यातील अनेक जटिल प्रश्न मार्गी लावले. दूरदृष्टी ठेवून सहकारी तत्त्वावर त्यांनी निफाड, गिरणा, रानवड, नाशिक व कादवा कारखान्यांकरिता मंजुरी मिळवून दिली.

पुढील काळात यातील काही कारखाने आर्थिकदृष्ट्या फायदेशीर न ठरल्याने त्यांनी नाशिक-सिन्नर, पळसे- रानवड- विंचूर, चांदवड- कादवा या कारखान्यांचे एकत्रीकरण केले. साखर संघाचे अध्यक्ष असताना केंद्राकडून एक हजार २५० टनाचे लायसेन्स मिळवून दिले. निफाड कारखान्याची क्षमता वाढविण्याची गरज निर्माण होताच काकासाहेबांनी प्रयत्न सुरू केले. शासनाचे नियम जाचक ठरताच शासनाला स्थानिक गरज पटवून देऊन खास तरतूद म्हणून ती मान्यता मिळविली.

काकासाहेबांनी आयुष्यात विविध जबाबदाऱ्या आणि आव्हाने स्वीकारली. मिळालेल्या पदांचा त्यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी वापर केला. काकासाहेब साखर संघाचे अध्यक्ष असताना व नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज, नवी दिल्लीचे सदस्य असताना महाराष्ट्र राज्यातील लेव्ही साखरेस त्यांनी योग्य भाव मिळवून दिला. १९७०-७१ या दोन वर्षांसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्षपद मिळाल्यावर त्यांनी आपला बराचसा वेळ या महत्त्वाच्या पदांसाठी दिला. मुंबईत साखर संघाच्या कार्यालयासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याकडून भूखंड मिळवून देण्यातही काकासाहेब यशस्वी ठरले. एवढ्यावरच काकासाहेब थांबले नाहीत, तर त्यांनी आर्थिक दुर्बल कारखान्यांसाठी सवलती, प्रोत्साहन योजना, नियम-कायद्यात शिथिलता आणून कारखान्यांना एक प्रकारे आर्थिक जीवदानच दिले. डेक्कन शुगर इन्स्टिट्यूट जे आज 'वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट' या नावाने प्रचलित आहे, त्याचीही मूळ संकल्पना काकासाहेबांनीच मांडली होती.

## सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन गौरव

काकासाहेब वाघ यांचे हे त्यागमय जीवन, त्यांनी सहकार-कृषी-शिक्षण-राजकारण या क्षेत्रात सामाजिक बांधिलकीने उभारलेले भव्यदिव्य कार्य, त्यांची तळमळ आणि काम करून घेण्याची हातोटी यामुळे जनतेने त्यांना 'कर्मवीर' ही पदवी बहाल केली. अनेक सन्मानाने त्यांना गौरविण्यात आले. पण काकासाहेबांना त्याबद्दल अप्रूप वाटले नाही. सन्मान होवो अथवा विरोध; जे काम योग्य वाटेल, मनाला पटेल तेच काकासाहेब अखेरच्या श्वासापर्यंत करत राहिले. काकासाहेबांचा समाजाप्रति त्याग, समर्पण व बहुजन समाजाच्या कल्याणासाठी केलेल्या अहोरात्र कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांच्या या अतुलनीय योगदानाबद्दल २६ जानेवारी १९७० रोजी 'पद्मश्री' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन यथोचित गौरव केला.

# के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

मध्यवर्ती कार्यालय : हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम,
पंचवटी, नाशिक – ४२२ ००३.



कै. बाळासाहेब दे. वाघ

## मा. त्रयींच्या पुण्यस्मरण दिनी कोटी-कोटी प्रणाम !



सहकारमहर्षी
कै. तात्यासाहेब बोरस्ते



कै. देवराम सयाजी वाघ तथा
पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ



कै. रतनशी हरिद्रास उदेशी तथा
काकुशेठ उदेशी

## पुण्यस्मरण सोहळा

कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशुर कै. काकुशेठ उदेशी व सहकार महर्षी माधवराव बोरस्ते या मान्यवरांचा "संयुक्त पुण्यतिथी कार्यक्रम" के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आपली ऑनलाईन उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा. डॉ. सुधीर तांबे**

आमदार, पदवीधर मतदार संघ, नाशिक विभाग

### प्रमुख पाहुणे

**मा. डॉ. राहुल डी. आहेर**

आमदार, विधान सभा, चांदवड

### प्रमुख वक्ते

**मा. डॉ. दिलीप धोंडगे**

माजी प्राचार्य

• वार व दिनांक : शुक्रवार, दि. २२ जुलै २०२२ • वेळ : दुपारी ०३.०० वा.

### कार्यक्रम स्थळ

मिटींग हॉल क्र. २, ४था मजला, के.के.वाघ शिक्षण संस्था, मध्यवर्ती कार्यालय,
हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-३.

• कार्यक्रमासाठी खालील Zoom Platform चा वापर करावा.


Link : https://tinyurl.com/mr25stnn   Meeting ID : 6135960075   Passcode : 54321

## आयोजक : के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

Engineering | Agriculture | Pharmacy (Degree & Diploma) | Polytechnic | MBA | MCA | Performing Arts | Fine Arts | Colleges of Computer Science, Commerce, Science & Arts | B.Ed. | CBSE & SSC Schools

# वाघ शिक्षण संस्थेत संयुक्त पुण्यतिथी

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कर्मवीर काकासाहेब वाघ, काकूशेठ







उदेशी व सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण दिन उद्या शुक्रवारी करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून चांदवड- देवळा मतदारसंघाचे आ. डॉ. राहुल आहेर तसेच माजी प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहे. विधान परिषदेचे पदवीधर आ. डॉ. सुधीर तांबे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, प्रा. के. एस. बंदी यांनी केले.



नाशिक : पुणे विद्यापीठ क्रिकेट संघात निवड झालेल्या विद्यार्थिनींसमवेत प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर आदी.

# दोघींची विद्यापीठाच्या क्रिकेट संघात निवड

नाशिक, ता. ३ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रिकेट संघात निवड झाली. एमबीए विभागातील प्रियंका घोडके व सिव्हिल विभागातील तेजस्विनी बद्दल अशी या दोन खेळाडू विद्यार्थिनींची नावे आहेत.

गेल्या आठवड्यात जयपूर येथे आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धा झाली. त्यात पुणे विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधित्व प्रियंका घोडके हिने केले, तर तेजस्विनी बद्दल हिने संघात यष्टीरक्षक म्हणून मोलाची भूमिका बजावली. महाविद्यालयातील व जिल्ह्यातील क्रिकेट खेळात करिअर करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे, असे मत प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी व्यक्त केले. आगामी काळात दोन्हीही खेळाडू त्यांची निवड सार्थ ठरवून अभिमानास्पद कामगिरी करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रात ठसा उमटवतील, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी व्यक्त केला. प्रा. के एस. बंदी यांनीही स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**Sakal 04-07-2022**



# के. के. वाघच्या विद्यार्थ्यांची पुणे विद्यापीठाच्या क्रिकेट संघात निवड

**नाशिक** : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेकरिता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दोन खेळाडू विद्यार्थिनींची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रिकेट संघात निवड झाली. महाविद्यालयाच्या एमबीए विभागातील प्रियंका घोडके व सिव्हिल विभागातील तेजस्विनी बट्टल अशी या दोन खेळाडू विद्यार्थिनींची नावे आहेत.

गेल्या आठवड्यात जयपूर येथे आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धा पार पडली. यात पुणे विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधित्व प्रियंका घोडके हिने केले तर तेजस्विनी बट्टल हिने संघात यष्टीरक्षक म्हणून मोलाची भूमिका बजावली. नक्कीच या कामगिरीने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तसेच नाशिक जिल्ह्याचे नाव अधिक उज्वल झाले. परिणामी, महाविद्यालयातील व जिल्ह्यातील क्रिकेट खेळात करिअर करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी व्यक्त केले.

तसेच आगामी काळात दोन्हीही खेळाडू त्यांची निवड सार्थ ठरवून अभिमानास्पद कामगिरी करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटवतील, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी व्यक्त केला. तसेच त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थिनींना आगामी स्पर्धे करिता शुभेच्छा दिल्या.

**Gavkari 04-07-2022**

आपलं महानगर | My महानगर.com

# के. के. वाघ कॉलेज विद्यार्थिनींची पुणे विद्यापीठ क्रिकेट संघात निवड




**नाशिक ।** अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दोन खेळाडू विद्यार्थीनिंची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रिकेटसंघात निवड झाली. त्यात एमबीएची प्रियंका घोडके व सिव्हिल विभागातील तेजस्विनी बद्वल यांचा समावेश आहे.

गेल्या आठवड्यात जयपूर येथे झालेल्या आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत पुणे विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधित्व प्रियंका घोडके हिने केले, तर तेजस्विनी बद्वल हिने संघात यष्टीरक्षक म्हणून मोलाची भूमिका बजावली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी या दोघींच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले.

आगामी काळात दोन्हीही खेळाडू त्यांची निवड सार्थ ठरवून अभिमानास्पद कामगिरी करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटवतील, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी व्यक्त केला. तसेच, त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थिनींना आगामी स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक व जिमखाना विभागप्रमुख प्रा. तानाजी कांडेकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.